रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २९९
www.ramprahar.com

◆ सोमवार, १८ मे २०२६ ◆ पाने ३२ ◆ किंमत ₹ २


## ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफी जाहीर करणार : मुख्यमंत्री



**पुणे :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची घोषणा करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जूनपूर्वी कर्जमाफी जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. राज्य सरकारची कर्जमाफी प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून कॅबिनेट उपसमितीची बैठकही पार पडली आहे. काही जिल्ह्यांकडून अतिरिक्त तांत्रिक माहिती मागविण्यात आली असून ती प्राप्त होताच प्रक्रिया पूर्ण करून कर्जमाफीची घोषणा करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी पुण्यात पत्रकारांशी बोलताना सांगितले. ते पुढे म्हणाले की, मराठा समाजासाठी राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात योजना राबवल्या आहेत. कोणतीही योजना बंद करण्यात आलेली नाही. जातवैधता प्रमाणपत्र प्रक्रियाही सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांनुसार सुरू असून सरकार मराठा समाजाच्या प्रश्नांवर संवेदनशीलपणे काम करीत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

### अंतरंग


आज कामोठ्यात कुस्तीचा थरार रंगणार/३
नवी मुंबई पोलीस दलात मोठे फेरबदल/५
नेरळमध्ये उल्हास नदीत बुडून तरुणाचा मृत्यू/२९





वारसा लोकहिताचा, चेहरा नव्या पिढीचा..!

नगरसेवक तथा माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका

# श्री. परेश ठाकूर

आपणांस
## वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

18 MAY




With Best Wishes from...

Eagle
Infra India Ltd.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १८ ◆ अंक २९९

www.ramprahar.com


◆ सोमवार, १८ मे २०२६ ◆ पाने ३२ ◆ किंमत ₹ २



**पुणे** : येथील महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज उद्यानात उभारण्यात आलेल्या बुधभूषण ग्रंथ रचनाकार छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती शिल्पाचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार डॉ. नीलम गोऱ्हे, सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक-नगरसेविका, अधिकाऱ्यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# आज कामोठ्यात कुस्तीचा थरार!

## परेशशेठ ठाकूर केसरी स्पर्धा रंगणार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे युवा नेते, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही क्रीडाप्रेमींसाठी भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे आणि रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'मा.श्री.परेशशेठ ठाकूर केसरी २०२६' जंगी कुस्त्यांचे सामने होणार आहेत. कामोठे सेक्टर ६ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या भव्य मैदानावर सोमवारी (दि. १८) सायंकाळी ४ वाजता हा थरार अनुभवायला मिळणार आहे.

या सामन्यांचे उद्‌घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार असून यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकासमंत्री नितेश राणे, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक, आमदार महेश लांडगे यांची प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थिती असणार असून प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेश बालदी, आमदार मंदाताई म्हात्रे, कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे, शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, महापौर नितीन पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, सभागृहनेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजपचे कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधींची उपस्थिती असणार आहे.

स्पर्धेत नेपाळ, महाराष्ट्रासह पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि दिल्ली येथील नामांकित मल्ल सहभागी होणार आहेत. हिंद केसरी, महाराष्ट्र केसरी तसेच महिला कुस्तीपटूंचे विशेष सामने हे यंदाच्या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण असणार आहे. स्पर्धेतील एकूण विजेत्यांना १५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांची पारितोषिके असणार आहेत. दरवर्षी हजारो क्रीडाप्रेमी या स्पर्धेला उपस्थित राहून मातीतील थरार अनुभवतात.









## संपादकीय

# मान्सूनची वर्दी

भारतीय अर्थव्यवस्था, शेती, जलव्यवस्था आणि ग्रामीण जीवन यांचा कणा असलेला नैऋत्य मोसमी पाऊस यंदा अंदमान-निकोबार बेटांमध्ये वेळेआधी दाखल झाला आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार २६ मेच्या सुमारास मान्सून केरळ किनारपट्टीवर धडक देईल आणि वातावरण पोषक राहिल्यास ६ जूनपर्यंत महाराष्ट्रातही त्याचे आगमन होऊ शकते. ही बाब दिलासादायक असली तरी यंदाच्या संपूर्ण मान्सून प्रवासावर 'अल निनो'चे सावट असल्याने आशा आणि चिंता यांचे मिश्र चित्र निर्माण झाले आहे.

**अरबी समुद्रातून वाहणारे दमट वारे, काळेभोर ढग आणि तापलेल्या धरतीला मिळणारा दिलासा यांचे नाव म्हणजे मान्सून. भारतातील मान्सून केवळ ऋतू नाही, तर तो देशाच्या आर्थिक चक्राचा प्राणवायू आहे. देशातील जवळपास ७० टक्के वार्षिक पर्जन्य जून ते सप्टेंबर या काळात पडतो. कृषी क्षेत्रातील मोठा भाग अजूनही पावसावर अवलंबून असल्याने मान्सूनचा थेट परिणाम अन्नधान्य उत्पादन, महागाई, ग्रामीण बाजारपेठ, रोजगार आणि औद्योगिक मागणीवर होतो. हवामान विभागाने यंदा केरळमध्ये मान्सूनचे आगमन साधारण सहा दिवस आधी होण्याचा अंदाज वर्तवला आहे. अंदमान-निकोबारमध्ये निर्माण झालेली अनुकूल वातावरणीय स्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे क्षेत्र आणि दमट वाऱ्यांचा वेग या घटकांमुळे मान्सूनची वाटचाल वेगाने सुरू झाली आहे. केरळ, महाराष्ट्राच्या दृष्टीने पाहिले तर कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी सध्या मान्सूनकडे डोळे लावून बसले आहेत. गेल्या काही वर्षांत अवकाळी पाऊस, गारपीट आणि अनियमित हवामानामुळे शेती मोठ्या संकटात सापडली. अशा परिस्थितीत वेळेवर येणारा मान्सून हा खरीप हंगामासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. भात, सोयाबीन, कापूस, ऊस आणि डाळींच्या पेरण्या मान्सूनवरच अवलंबून असतात. वेळेवर पाऊस झाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते, मात्र पावसाचे असमान वितरण झाले तर परिस्थिती पुन्हा बिकट होऊ शकते. याच ठिकाणी 'अल निनो' हा हवामानातील जागतिक घटक महत्त्वाचा ठरतो. प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठभागाचे तापमान असामान्यरीत्या वाढल्यास 'अल निनो' स्थिती निर्माण होते. या बदलाचा परिणाम जगभरातील वारे, पर्जन्यमान आणि हवामान चक्रावर होतो. भारतात अल निनोचा संबंध सामान्यतः कमी पाऊस, उष्णतेच्या लाटा आणि दुष्काळी परिस्थितीशी जोडला जातो. अमेरिकेच्या 'नोआ' या हवामान संस्थेने यंदा अल निनो विकसित होण्याची शक्यता ८० टक्क्यांहून अधिक असल्याचे म्हटले आहे. याचा अर्थ असा की, मान्सून सुरुवातीला वेगाने पुढे सरकला तरी जून, जुलै आणि ऑगस्ट महिन्यांतील त्याची तीव्रता कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेकदा मान्सून 'सर्जेस' म्हणजे टप्प्याटप्प्याने पुढे सरकतो. सुरुवातीचा जोरदार पाऊस नंतर अचानक कमी होऊ शकतो. त्यामुळे कृषी नियोजन करताना केवळ प्रारंभिक पावसावर विसंबून चालणार नाही. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर मान्सून अधिक अनिश्चित होत चालल्याचे मागील दशकातील अनुभव स्पष्ट करतात, परंतु प्रत्येक संकटात संधी दडलेली असते. हवामान बदल आणि अल निनोसारख्या घटनांमुळे भारताला आता पारंपरिक शेतीपद्धतींपासून पुढे जावे लागणार आहे. जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पीकविविधीकरण आणि हवामानाधारित शेती व्यवस्थापन यावर अधिक भर देण्याची गरज आहे.**

# पनवेलच्या विकासासाठी समर्पित नेतृत्व परेशशेठ ठाकूर



रायगड आणि नवी मुंबई परिसरातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैद्यकीय आणि क्रीडा क्षेत्रात गेली अनेक वर्षे सातत्याने कार्यरत राहून लोकसेवेचा आदर्श निर्माण करणारे युवा नेते परेशशेठ ठाकूर हे आज पनवेल परिसरातील जनतेच्या मनात अत्यंत विश्वासार्ह, संवेदनशील आणि कार्यक्षम नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था तसेच रामशेठ ठाकूर आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलाचे संस्थापक-सदस्य म्हणून त्यांनी विविध क्षेत्रांत अनेक उल्लेखनीय उपक्रम राबवत समाजहिताचा वसा अखंडपणे जपला आहे. समाजकारण, लोकसेवा आणि सर्वसामान्य माणसांशी जोडलेली नाळ हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख आहे. श्रीमंतीचा वारसा लाभूनही विलासी जीवनाचा मोह टाळत सामान्य जनतेमध्ये मिसळून राहण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय त्यांच्या विचारसरणीची साक्ष देतो. "गरजूंच्या चेहऱ्यावरचे समाधान हेच खरे यश" या विचाराने प्रेरित होऊन त्यांनी आयुष्यभर लोकसेवा करण्याचा संकल्प केला आणि त्याच मार्गावर ते आजही ठामपणे चालत आहेत.

१८ मे १९७८ रोजी जन्मलेल्या परेशशेठ ठाकूर यांनी पनवेल येथील व्ही.के. हायस्कूलमध्ये आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. शालेय जीवनापासूनच त्यांच्यामध्ये नेतृत्वगुण, मित्रपरिवाराशी आत्मियता आणि सामाजिक जाण दिसून येत होती. त्यानंतर त्यांनी महात्मा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पनवेल येथून रसायनशास्त्र विषयात पदवी प्राप्त केली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी व्यवसाय किंवा वैयक्तिक सुखसोयींचा मार्ग निवडण्याऐवजी समाजसेवेचा मार्ग स्वीकारला. लोकसेवेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेशी त्यांचे निर्माण झालेले नाते अधिक दृढ होत गेले आणि त्यातूनच त्यांनी २०१७ साली सक्रिय राजकारणात प्रवेश केला. पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक १९मधून भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून त्यांनी निवडणूक लढवली आणि प्रचंड बहुमताने नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यांच्या विजयामागे जनतेचा त्यांच्यावरील प्रचंड विश्वास आणि त्यांनी केलेले सातत्यपूर्ण सामाजिक कार्य हेच प्रमुख कारण होते.

नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर परेशशेठ ठाकूर यांची सभागृह नेतेपदी निवड झाली. ही जबाबदारी त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे आणि संयमाने पार पाडली. सलग पाच वर्षे त्यांनी सभागृहाचे कामकाज अत्यंत शिस्तबद्ध, निःपक्षपाती आणि खेळीमेळीच्या वातावरणात चालवत "आदर्श सभागृह नेता" म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. विरोधी पक्षातील सदस्यांनाही सन्मानपूर्वक वागणूक देत लोकशाही मूल्ये जपण्याचा त्यांनी प्रयत्न केला. निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता आणि विकासकामांना गती देण्यावर त्यांचा विशेष भर राहिला.

परेशशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांचा कार्यकर्त्यांशी असलेला जिव्हाळ्याचा संबंध. राजकारणात मोठ्या पदावर असूनही त्यांनी कधीही सामान्य कार्यकर्त्यांपासून अंतर ठेवले नाही. रांगेतील शेवटच्या कार्यकर्त्यालाही आपलेसे करून त्याची विचारपूस करणारा नेता म्हणून ते ओळखले जातात. कार्यकर्त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे आणि गरज पडल्यास त्यांच्या मदतीला धावून जाणे हा त्यांच्या स्वभावाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळेच कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याविषयी अपार प्रेम आणि आदर आहे.

सामाजिक प्रश्नांवर ठाम भूमिका घेण्याची परेशशेठ ठाकूर यांची वृत्ती अनेक प्रसंगांत दिसून आली आहे. कळंबोली सेक्टर ५ येथील भाजी मार्केटमध्ये विक्रेत्यांकडून घेतल्या जाणाऱ्या अनैतिक हप्त्यांविरोधात त्यांनी उभारलेले आंदोलन हे त्याचे ठळक उदाहरण ठरले. या आंदोलनामुळे अनेक छोट्या विक्रेत्यांना दिलासा मिळाला आणि अन्यायाविरोधात आवाज उठवणारा नेता म्हणून त्यांची प्रतिमा अधिक बळकट झाली. सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी प्रशासनासमोर ठामपणे उभे राहण्याचे धैर्य त्यांनी सातत्याने दाखवून दिले आहे. पत्रकार आणि माध्यम प्रतिनिधींशीही त्यांनी कायम सकारात्मक संवाद ठेवला आहे. पनवेलमध्ये पत्रकार भवन उभारण्याच्या मागणीबाबत पत्रकारांशी बैठक घेऊन त्यांनी विषय गांभीर्याने हाताळला. पत्रकारांना आवश्यक सुविधा मिळाव्यात यासाठी त्यांनी पुढाकार घेतल्यामुळे पत्रकार क्षेत्रातही त्यांच्याबद्दल विशेष आदर व्यक्त केला जातो.

वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी आयोजित केलेली रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, नेत्र तपासणी शिबिरे आणि विविध आरोग्य जनजागृती उपक्रम हजारो नागरिकांसाठी लाभदायक ठरले आहेत. गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे, आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी तत्पर राहणे आणि आरोग्य क्षेत्रात सामाजिक जबाबदारी पार पाडणे हे त्यांच्या कार्याचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.

क्रीडा क्षेत्रातही परेशशेठ ठाकूर यांनी मोठे योगदान दिले आहे. कबड्डी, खो-खो, क्रिकेट, कुस्ती यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करून त्यांनी ग्रामीण आणि शहरी भागातील युवकांना आपले कौशल्य दाखवण्याचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. अनेक तरुणांना क्रीडाक्षेत्रात प्रोत्साहन देऊन त्यांनी त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलाच्या माध्यमातून क्रीडाप्रेमींसाठी आधुनिक सुविधा निर्माण करण्याचे कार्य त्यांनी पुढाकाराने केले आहे.

शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, नृत्य स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, सांस्कृतिक महोत्सव यांसारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील कला, विचारशक्ती आणि आत्मविश्वास विकसित करण्याचे काम त्यांनी केले आहे. युवकांमध्ये सकारात्मक विचार, सामाजिक जाणीव आणि नेतृत्वगुण निर्माण व्हावेत यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांची कार्यपद्धती ही केवळ राजकारणापुरती मर्यादित नाही, तर ती समाजकारणाशी घट्ट जोडलेली आहे. कोणत्याही संकटसमयी सर्वसामान्य नागरिकांच्या मदतीला धावून जाणारा नेता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. पूरस्थिती, वैद्यकीय आपत्ती किंवा गरजू कुटुंबांवरील संकट अशा विविध प्रसंगांत त्यांनी वैयक्तिक पातळीवर मदतीचा हात दिला आहे. त्यामुळेच जनतेच्या मनात त्यांच्याबद्दल एक वेगळा विश्वास निर्माण झाला आहे.

ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा आदर राखत तरुण कार्यकर्त्यांना योग्य दिशा देणे हे परेशशेठ यांच्या नेतृत्वाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. शिस्त, संयम आणि कार्यकर्त्यांवरील प्रेम या गुणांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पहायला मिळतो. हे सर्व संस्कार त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब आणि आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या मार्गदर्शनातून आत्मसात केले आहेत. समाजसुधारकांच्या विचारांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून निःस्वार्थीपणे जनसेवेची मशाल हाती घेणाऱ्या ठाकूर परिवाराचा पनवेलकरांना सार्थ अभिमान आहे. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारा, विकासकामांना प्राधान्य देणारा आणि समाजहितासाठी सदैव तत्पर असलेला नेता म्हणून परेशशेठ ठाकूर यांनी स्वतःची वेगळी छाप निर्माण केली आहे.

आज पनवेल परिसरातील युवकांसाठी परेशशेठ ठाकूर प्रेरणास्थान बनले आहेत. सामाजिक बांधिलकी, कार्यक्षम नेतृत्व, लोकांप्रति असलेली आत्मियता आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यांच्या बळावर त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आगामी काळात त्यांच्या कार्याचा विस्तार आणखी मोठ्या प्रमाणावर होऊन ते समाजसेवेच्या क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करतील, असा विश्वास सर्वसामान्य जनतेला वाटतो. जनतेच्या सेवेसाठी समर्पित असलेल्या या युवा नेतृत्वाला वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या पुढील वाटचालीला उत्तुंग यश लाभो आणि समाजसेवेची त्यांची ही अखंड ज्योत सदैव प्रज्वलित राहो, हीच सदिच्छा!

**-ॲड. प्रकाश बिनेदार,**
सभागृह नेते, पनवेल महापालिका

# बालविवाहप्रकरणी पाच जणांवर गुन्हा

**खोपोली : प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीचे लग्न लावल्याप्रकरणी चिंतामण शंकर हिलम, काशी चिंतामण हिलम, रामू शाबा वाघमारे, बेबी रामू वाघमारे आणि पीडितेचा पती नितेश रामू वाघमारे (सर्व राहणार भिलवले वावंढळ, ता. खालापूर) यांच्याविरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित मुलगी अल्पवयीन असताना तिचे गेल्या वर्षी १६ मे रोजी भिलवले येथील मंदिरात लग्न लावून देण्यात आले होते. यानंतर पीडिता गरोदर राहिल्यानंतर वावर्ले प्राथमिक आरोग्य केंद्रात तपासणी करता गेली असता ती अल्पवयीन असल्याची बाब उघडकीस आली.

याबाबत पोलिसांना माहिती देण्यात आल्यानंतर खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विशाल पवार यांनी तपास करीत पीडित मुलीचे आई-वडील, सासू-सासरे आणि पतीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# धारणीमध्ये युवकाची आत्महत्या

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील धारणी आदिवासीवाडी येथे राहणारा करण भगवान वाघे (१९) याने ओढणीने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (दि. १५) दुपारी घडली. धारणी आदिवासीवाडीजवळील कांबळे फार्महाऊस पाठीमागील माळरानावर असलेल्या झाडाला करणने ओढणीच्या साह्याने गळफास घेतला. याबाबत धर्मा सीताराम वाघे यांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर करणचा मृतदेह चौक ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. करणच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पुढील तपास पोलीस हवालदार बागूल करीत आहेत.

# रायगडच्या कुस्तीविश्वाला नवी दिशा देणारे नेतृत्व



रायगड जिल्ह्यातील कुस्ती आणि क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी सातत्याने कार्य करणारे रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनचे अध्यक्ष परेशशेठ ठाकूरसाहेब हे आज क्रीडाप्रेमींसाठी प्रेरणास्थान बनले आहेत. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि सामाजिक बांधिलकीमुळे रायगड जिल्ह्यातील कुस्तीला नवे बळ मिळत असून ग्रामीण भागातील अनेक खेळाडूंना मोठी संधी उपलब्ध होत आहे.

विशेषतः नितळस येथे उभारण्यात येणाऱ्या आधुनिक कुस्ती प्रशिक्षण केंद्रासाठी त्यांनी दिलेले आर्थिक सहकार्य हे अत्यंत कौतुकास्पद मानले जात आहे. ग्रामीण भागातील होतकरू खेळाडूंना उत्तम प्रशिक्षण, सरावासाठी आवश्यक सुविधा आणि स्पर्धात्मक वातावरण मिळावे या उद्देशाने त्यांनी या उपक्रमाला मोठा पाठिंबा दिला आहे. त्यामुळे अनेक तरुणांना राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळत आहे.

याशिवाय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांसाठी रायगड जिल्ह्यातील संघांना आर्थिक मदत, प्रवास खर्च, क्रीडा साहित्य आणि प्रोत्साहन देण्याचे कामही ते सातत्याने करत आहेत. त्यांच्या या सहकार्यामुळे अनेक खेळाडूंमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला असून रायगड जिल्ह्याचे नाव राज्यभर उज्ज्वल होत आहे.

कुस्तीपुरतेच मर्यादित न राहता क्रिकेट, कबड्डी, खो-खो आणि इतर खेळांच्या विकासासाठीही ते सक्रियपणे प्रयत्नशील आहेत. पनवेल आणि रायगड परिसरात क्रीडा संस्कृती रूजविण्यासाठी त्यांनी विविध स्पर्धा, शिबिरे आणि मार्गदर्शन उपक्रम आयोजित केले आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक युवक व्यसनमुक्त होऊन क्रीडा क्षेत्राकडे आकर्षित होत असल्याचे चित्र दिसत आहे.

सामाजिक बांधिलकी, साधेपणा आणि मदतीसाठी सदैव तत्पर असलेला त्यांचा स्वभाव हा सर्वसामान्य नागरिकांमध्ये विशेष आदराचा विषय ठरला आहे. गरजू खेळाडूंना आर्थिक मदत असो किंवा एखाद्या कुटुंबाच्या अडचणीच्या वेळी दिलासा देणे असो, परेशशेठ ठाकूरसाहेब नेहमीच मदतीसाठी पुढे असतात.

रायगड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला सक्षम नेतृत्व मिळाल्यामुळे आगामी काळात अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडतील, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे. परेशशेठ ठाकूर यांच्या कार्यामुळे रायगड जिल्ह्याची क्रीडा ओळख अधिक भक्कम होत असून युवकांसाठी ते प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरत आहेत. त्यांना वाढदिवसानिमित्त खूप खूप शुभेच्छा!

**-राष्ट्रीय पैलवान रूपेश पावशे,**
संस्थापक अध्यक्ष, लोकनेते रामशेठ ठाकूर राष्ट्रीय कुस्ती संकुल नितळस, ता. पनवेल

# आपली माती आपली माणसं संघटनेच्या वतीने पोलादपूर तालुक्यात २५०० फळझाडांचे वाटप

## अर्जुन पार्टे यांना आगळीवेगळी श्रद्धांजली



**पोलादपूर : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील आपली माती आपली माणसं संघटनेच्या वतीने २५०० फळझाडांचे वाटप करण्यात आले. खोपड गावचे 'आपली माती आपली माणसं' संघटनेचे ग्रामीण भागातील सक्रीय कार्यकर्ते ह.भ.प. अर्जुन पार्टे यांचे अचानक निधन झाल्याने त्यांना उत्तरकार्याच्या दिवशी फळझाडांच्या वाटपाचा उपक्रम राबवून त्यांना आगळीवेगळी श्रद्धांजली वाहण्यात आली

संघटनेतर्फे विविध समाजोपयोगी उपक्रम दरवर्षी राबविण्यात येत असतात. यंदा २५०० फळझाडांच्या वाटपाचा उपक्रम राबविण्याचे नियोजन पूर्ण झाले असतानाच खोपड गावातील संघटनेचे सक्रिय कार्यकर्ते अर्जून पार्कचे यांचे अकस्मात निधन झाले. त्यांच्या सामाजिक कार्याची आठवण समाजासमोर निरंतर राहावी तसेच पर्यावरण रक्षणाचा उद्देश साध्य होण्यासाठी यावेळीचा फळझाडांच्या वाटपाचा उपक्रम संघटनेतर्फे त्यांच्या उत्तरकार्याच्या दिवशी संस्थापक राज पार्टे, अध्यक्ष निलेश कोळसकर, हरी पवार, संजय कळंबे, गणेश मालुसरे तसेच खेडेकर आणि पदाधिकारी व सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत राबविण्यात आला.

मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल होत असून ओझोनचे प्रमाण घटल्याने अतिनील किरणे वातावरणाचे संतुलन बिघडवित ऑक्सिजनची कमतरता निर्माण करीत असल्याने प्रत्येकाने वृक्षारोपण करणे गरजेचे असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. ह.भ.पअर्जुन पार्टे यांच्या स्मरणार्थ लावलेली फळझाडे त्यांच्या कार्याचे स्मरण मनात निरंतर ठेवतील, अशी भावना संघटनेचे अध्यक्ष नितेश कोळंबकर व अन्य पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.





**पनवेल :** माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे होत आहे. यानिमित्त मुंबई शिक्षण उपसंचालक कार्यालयातील उपसंचालक बाबासाहेब चिमणे आणि मंत्रालयातील कक्ष अधिकारी रामसिंग डेरे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभीष्टचिंतन केले.



**पनवेल :** टीआयपीएल कंपनीचे जनरल मॅनेजर संतोष देशमुख यांची कन्या डॉ. प्रियांका देशमुख हिने नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय येथून एमबीबीएसची पदवी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी संतोष देशमुख हेही उपस्थित होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# नावडे उपविभागात महापालिकेची अतिक्रमणविरोधी धडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेने शहरातील अतिक्रमणांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला असून प्रभाग समिती 'अ' अंतर्गत नावडे उपविभागात १६ मेपासून धडक कारवाई सुरू केली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार सेक्टर ३४ आणि ३५ परिसरातील मार्जिनल स्पेसच्या बाहेर ठेवण्यात आलेल्या वस्तू हटविण्यात आल्या. शहरातील फुटपाथवर हातगाडी लावून अनधिकृतपणे उद्योग-व्यवसाय करणाऱ्यांवरही अतिक्रमण पथकाने कारवाई करीत सामान जप्त केले आहे.

अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे आणि उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी पनवेल महापालिकेच्या चारही प्रभागांमध्ये अतिक्रमणाविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी सुबोध ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नावडे उपविभागात ही मोहीम राबवण्यात येत आहे. अतिक्रमणविरोधी पथकाने दुकानाबाहेरील मार्जिनल स्पेसमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या वस्तू जप्त केल्या असून पादचाऱ्यांना मोकळी वाट मिळावी यासाठी फुटपाथवरील अनधिकृत हातगाड्यांवरही कारवाई केली आहे. महापालिकेच्या या कारवाईमुळे नावडे परिसरातील रस्ते आणि फुटपाथ मोकळे होण्यास मदत झाली असून नागरिकांनीही या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.



## नवी मुंबई पोलीस दलात मोठे फेरबदल; सात वरिष्ठ अधिकाऱ्यांची बदली

**पनवेल : वार्ताहर**

राज्याच्या गृह विभागाने पोलीस प्रशासनात मोठे फेरबदल केले असून अपर पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक आणि पोलीस उपआयुक्त श्रेणीतील अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि पदोन्नतीचे आदेश जारी केले आहेत. या फेरबदलात अनेक अनुभवी अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत, तर काहींना पदोन्नती मिळाली आहे.

नवी मुंबईचे पोलीस सहआयुक्त संजय येनपुरे यांची मुंबईत विशेष पोलीस महानिरीक्षक (व्हीआयपी सुरक्षा) या महत्त्वपूर्ण पदावर बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी नवी मुंबईचेच अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे यांची पदोन्नतीने पोलीस सहआयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेल्या पाच उपायुक्तांच्या बदल्या इतर शहरात करण्यात आल्या आहेत.

त्यामध्ये परिमंडळ-१चे पोलीस उपआयुक्त पंकज डहाणे यांची पोलीस उपायुक्त-बृहन्मुंबई, परिमंडळ-३ चे उपआयुक्त प्रशांत मोहिते यांची उपआयुक्त-छत्रपती संभाजीनगर शहर, उपआयुक्त (मुख्यालय) संजय पाटील यांची उपआयुक्त-पिंपरी चिंचवड, वाहतूक विभागाचे उपआयुक्त तिरुपती काकडे यांची पोलीस अधीक्षक-महामार्ग सुरक्षा (रायगड) आणि डायल-११२च्या पोलीस उपआयुक्त प्रिती टिपरे यांची पोलीस उपआयुक्त-मीरा-भाईंदर-वसई-विरार येथे बदली करण्यात आली आहे.

नवी मुंबई शहरातील रिक्त होणाऱ्या पोलीस उपआयुक्त पदांवर प्रकटीकरण-१ चे पोलीस उपआयुक्त विशाल ठाकूर, राज्य गुप्तवार्ता विभागाचे उपआयुक्त योगेश चव्हाण, अन्न-औषधी प्रशासन (मुंबई)चे पोलीस अधीक्षक राहुल खाडे आणि पोलीस महासंचालक कार्यालयातील सहाय्यक विशेष पोलीस महानिरीक्षक विजय खरात यांची नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात बदली करण्यात आली आहे, तर राज्य महामार्ग सुरक्षा (रायगड)चे पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांची डायल-११२ नवी मुंबई या पदावर बदली करण्यात आली आहे.

## निवडक

### मंगळसूत्र खेचून चोरटे पसार

**नवीन पनवेल :** महिलेच्या गळ्यातील ३० ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र खेचून चोरटे पसार झाले. याप्रकरणी १६ मे रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ मे रोजी रात्री सव्वानऊच्या सुमारास किरण सोसायटी सेक्टर ७ खांदा कॉलनी येथील सोसायटीच्या जिन्याच्या पायऱ्यावरून महिला पायी चालत जात होती. यावेळी पाठीमागून चालत आलेल्या अनोळखी इसमांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचले आणि सोसायटीच्या बाहेर येऊन रस्त्यावर उभ्या असलेल्या मोटारसायकलवर बसून ते पळून गेले.

### ३० वर्षीय तरुणाचे अपहरण

**नवीन पनवेल :** कामावर जात असलेल्या ३० वर्षीय विनोद रामू पवार याला कारमध्ये बसवून त्याचे अपहरण केल्याचा गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्यात १५ मे रोजी दाखल करण्यात आला आहे. विनोद पवार हा त्याच्या मित्रासोबत पनवेल येथे कामावर जात होता. तो पारगाव डुंगी येथे पोहचला असता क्रेटा कारमधील अनोळखी इसमांनी त्याला रस्त्यामध्ये अडवले आणि जबरदस्तीने कारमध्ये बसवून पळवून नेले.

### महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण

**नवीन पनवेल :** महावितरणच्या कर्मचाऱ्यांना हाताबुक्क्यांनी मारहाण आणि शिवीगाळ केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १५ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ मे रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास संतोष मेंगाळ (प्रधान तंत्रज्ञ, महावितरण नेरे प्रभाग) हे आणि राजेश हे दुन्दरे येथे महावितरणचे वीज पुरवठा सुरळीत करण्याचे काम करीत होते. या वेळी आरोपीने त्यांच्या कामात अडथळा आणला आणि मारहाण तसेच शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी दिली.

### लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**नवीन पनवेल :** अल्पवयीन मुलीला लग्न करण्याचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी शुभम तुळशीराम मुकादम (रा. नारपोली, ता.पनवेल) याच्या विरोधात १५ मे रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० एप्रिल ते २ मेदरम्यान पीडित मुलगी ही अल्पवयीन असताना आरोपी शुभमने तिच्यासोबत मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले आणि तिच्या घरी रात्रीच्या वेळी गप्पा मारण्याच्या बहाण्याने माझे तुझ्यावर प्रेम आहे, तुझे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर मी लग्न करणार आहे असे बोलून तिला लग्नाचे आमिष दाखवले आणि तिच्यावर अत्याचार केला.

### महालक्ष्मी मातेचा वर्धापन दिन

**नवीन पनवेल :** श्री महालक्ष्मी मातेचा वर्धापन दिन



सोहळा गुरुवारी (दि. २१) पनवेल तालुक्यातील दुंदरेपाडा येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी सकाळी साडेसात वाजल्यापासून होमहवन, कलशपूजन, महाअभिषेक, आरती, प्रसाद, सार्वजनिक चक्रीभजन, हरिपाठ, आरती, वारकरी जोड भजनाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी भाविकांनी, नागरिकांनी दर्शनासाठी यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### घरफोडीत लाखोंचा मुद्देमाल चोरला

**नवीन पनवेल :** तळोजा नावडे फेस टू येथे केलेल्या घरफोडीत चोरांनी दोन लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात १६ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ मे रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ८ वाजेच्या दरम्यान फिर्यादी प्रदीप सोनवणे यांच्या बंद घराच्या दरवाज्याचे लॉक तोडून चोरांनी आत प्रवेश केला आणि मंगळसूत्र, सोन्याचा नेकलेस, अंगठ्या, ब्रेसलेट, झुमके आणि रोख रक्कम चोरून नेली.

### दोन लाखांच्या मालाची चोरी

**नवीन पनवेल :** खारघर येथील गाळ्याचे शटर उचकटून चोरांनी दोन लाख रुपयांच्या मालाची चोरी केली. याप्रकरणी १५ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनीत कुमार तिवारी हे घोटगाव, तळोजा येथे राहत असून ते प्लॅटिनम ग्रुप येथील साइटवर काम करतात. १२ ते १३ मेदरम्यान सेक्टर ३० खारघर येथील साइटवरील गाळ्याचे शटर उचकटून तांब्याचे दोन वायर, ॲल्युमिनियम पाईप, पितळेचे नग, तांब्याचे पाईप चोरांनी चोरून नेले.

## पनवेलमध्ये 'एक्सपायरी डेट'च्या अभिवाचनाने प्रशिक्षणार्थी भारावले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या अभिनय प्रशिक्षण शिबिराच्या सहाव्या दिवशी नाट्याचा वेगळाच अनुभव प्रशिक्षणार्थींना मिळाला. शनिवारी (दि. १६) स्नेहांकित पुणे निर्मित 'एक्सपायरी डेट' या प्रहसनात्मक एकांकिकेचे नाट्य अभिवाचन पार पडले आणि नवोदित कलाकार भारावून गेले.



धनंजय सरदेशपांडे लिखित आणि प्रा. रमाकांत मुळे दिग्दर्शित या अभिवाचनात ज्येष्ठ कलावंत प्रा. रमाकांत मुळे, अविनाश पाठक, स्वाती ओक, श्रुती मुळे-नांदापूरकर आणि डॉ. सचिन व्यवहारे यांनी सहभाग घेतला. अभिवाचनानंतर त्यांनी खारघर आणि पनवेलच्या प्रशिक्षणार्थींशी संवाद साधत नाट्यातील बारकावे उलगडून सांगितले. या वेळी मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, कविता ठाकूर, प्रा. गणेश जगताप आणि वर्षा कुलकर्णी उपस्थित होते.

शिबिरासाठी अशोक केंद्रे, संकेत खेडकर, विद्यानाथ सुर्वे, मनोज चिताडे, विक्रांत धीवरे हे प्रशिक्षक मार्गदर्शन करीत आहेत. खारघर, कळंबोली आणि पनवेल येथे सीनियर-ज्युनियर गटांमध्ये हे शिबिर सुरू आहे. पुढे अभिनेते महेश कोकाटे आणि डॉ. संजय पाटील देवळाणकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. ११ ते १९ मेदरम्यान सुरू असलेल्या या शिबिराचा समारोप मंगळवारी १९ मे रोजी सकाळी १०.३० ते १ वाजेपर्यंत होणार आहे. नाट्य, सिने क्षेत्रातील दिग्गजांच्या मार्गदर्शनामुळे पनवेलमधील नवोदित कलाकारांना मोठा हुरूप आला आहे.

या कार्यक्रमासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेल विधानसभा आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पनवेलचे उपाध्यक्ष तथा नगरसेवक परेश ठाकूर, बाल रंगभूमी परिषदेच्या राज्य अध्यक्ष नीलम शिर्के-सामंत, ज्येष्ठ छायाचित्रणकार तथा दिग्दर्शक, निर्माते सुरेश देशमाने, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नियामक मंडळ सदस्य प्राध्यापक डॉ. संजय पाटील-देवळाणकर तसेच सर्व नगरसेवक उपस्थित राहणार आहेत.



**पनवेल : नुकत्याच जाहीर झालेल्या दहावी बोर्डाच्या परीक्षेत बेलपाडा येथील सिमरिता संतोष म्हात्रे हिने ८९.६० टक्के गुण मिळवून उत्तुंग यश संपादन केले आहे. सिमरिता ही सेंट मेरीज जेएनपी स्कूलची विद्यार्थिनी असून या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.**

## नवी मुंबईतील रेल्वेस्थानकांच्या देखभालीचा तिढा सुटणार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील अनेक रेल्वे स्थानकांची रखडलेली देखभाल, मोडकळीस आलेल्या सुविधा आणि प्रवाशांच्या वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर सिडकोच्या अखत्यारीतील स्थानके मध्य रेल्वेकडे हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेला अखेर गती मिळण्याची चिन्हे आहेत. शुक्रवारी मुंबईत झालेल्या बैठकीत सिडकोच्या अखत्यारीतील स्थानके येत्या सहा महिन्यांत मध्य रेल्वेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय झाल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील मध्य रेल्वे मुख्यालयात झालेल्या बैठकीत नवी मुंबईतील रेल्वेमार्गावरील स्थानकांची स्थिती, देखभालीचा अभाव आणि सुरक्षेचे प्रश्न यावर सविस्तर चर्चा झाली. विशेषतः वाशी-बेलापूर, ठाणे-तुर्भे-वाशी-नेरुळ आणि नेरुळ-उरण या मार्गांवरील स्थानकांच्या देखभालीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. स्थानकांवरील तुटलेली छते, खराब सरकते जिने, अपुरी स्वच्छतागृहे, बंद तिकीट खिडक्या, अंधारे भुयारी मार्ग आणि अपुरी स्वच्छता याबाबत प्रवाशांकडून सातत्याने तक्रारी होत आहेत.

बैठकीत वाशी ते बेलापूर आणि खारघर ते खांदेश्वर या स्थानकांसाठीचे देखभाल करार अनुक्रमे २००३ आणि २००८ मध्ये संपुष्टात आल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यानंतर नव्याने करार न झाल्याने देखभालीची कामे अनेक ठिकाणी रखडली आहेत. याशिवाय ऐरोली, रबाळे, घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे, बामणडोंगरी, खारकोपर आणि खारघर या स्थानकांसाठी अद्याप औपचारिक देखभाल करारच केला नसल्याची बाबही बैठकीत मांडण्यात आली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, वाढती लोकसंख्या, नवीन निवासी प्रकल्प आणि महामार्ग विस्तारामुळे येत्या काही वर्षांत उपनगरी रेल्वेवरील ताण मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थानकांचे व्यवस्थापन एकाच यंत्रणेकडे देऊन देखभाल, दुरुस्ती आणि प्रवासी सुविधा अधिक परिणामकारकपणे राबविण्याची गरज बैठकीत अधोरेखित करण्यात आली.

## सानपाडा-जुईनगर रेल्वेमार्गावरील उड्डाणपुलाचे काम जलदगतीने पूर्ण करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

जुईनगर येथील रेल्वे क्रॉसिंगमध्ये २४ नोव्हेंबर २०१८ रोजी पालिकेच्या परिवहन सेवेच्या बसला कार शेडमध्ये जाणाऱ्या ट्रेनची धडक बसली होती. यात ८ नागरिक जखमी झाले होते. त्यामुळे सानपाडावासीयांकडून जुईनगर सानपाडा येथे उड्डाणपूल बांधावा, अशी मागणी करण्यात आली होती. त्यानुसार नवी मुंबई महापालिकेने जुईनगर सानपाडा येथील कारशेडवर उड्डाणपूल बांधण्याचे ठरवलेr होते. हा उड्डाणपूल लवकरात लवकर पूर्ण करावा, अशी येथील रहिवाशांची मागणी आहे. या उड्डाणपुलाअभावी जुईनगरवासीयांची वाट खडतर राहणार असून धोका पत्करूनच या



रेल्वे फटकातून नागरिकांना प्रवास करावा लागत आहे. एनएमएमटी बसला ट्रेनने ठोकर दिल्यावर या मार्गाचे गांभीर्य ठळकपणे समोर आले होते. याबाबत तत्कालीन आयुक्त डॉ. रामस्वामी एन. यांनी ही बाब गांभीर्याने घेत या रेल्वे क्रॉसिंगवरून उड्डाणपूल बांधावा अशी संकल्पना मांडली होती. नवी मुंबई पालिकेने त्यानुसार उड्डाणपूल बांधण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी तब्बल ७८ कोटी ४५ लाख ६५ हजार ६५० रुपये खर्चाचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता.

सानपाडा कारशेड परिसर रेल्वेचा असल्याने या भागातून रस्ता करण्यास रेल्वेचा विरोध होता. हा विरोध झुगारून नागरिकांच्या सेवेसाठी ट्रॅकवर पालिकेने मार्ग तयार केला. त्याचा फायदा जुईनगरवासीयांना रेल्वेस्थानक गाठण्यासाठी झाल्याचे दिसून येत आहे. हा उड्डाणपूल व्हावा यासाठी सर्वपक्षीयांनी पालिकेकडे मागणी केली होती. या उड्डाणपुलामुळे शहर गतिशील योजनेला पाठबळ मिळून ट्रॅफिकच्या समस्येवर तोडगा निघेल, असे पालिका प्रशासनाचे म्हणणे होते.

पालिकेने आणलेल्या प्रस्तावात या पुलाची लांबी एक किलोमीटर ठेवण्यात आली होती तसेच शहर गतिशील योजनेंतर्गत या पुलाचा समावेश करण्यात आला होता. तत्कालीन आयुक्त डॉ. रामास्वामी यांनी या उड्डाणपुलाचा प्रस्ताव आणला होता. जुईनगर पेट्रोलपंपापर्यंत हा उड्डाणपूल पोहचण्याची शक्यता असल्याने जुईनगर येथील वाहतूक कोंडी फोडण्यात पालिकेला यश येणार होते.

## जांभूळपाड्यात एकाची हत्या; आरोपी ताब्यात

**उरण : बातमीदार**


उरण तालुक्यातील जांभूळपाडा येथील आदिवासीवाडीवर दोन व्यक्तींमध्ये झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर थेट खुनात झाल्याची धक्कादायक घटना शनिवारी (दि. १६) सायंकाळी घडली. या चाकू हल्ल्यात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असून उरण पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपीला तत्काळ अटक केली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार शनिवारी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास जांभूळपाडा येथील वाडीवर दोन व्यक्तींमध्ये कोणत्या तरी कारणावरून जोरदार भांडण झाले. हा वाद इतका विकोपाला गेला की रागाच्या भरात आरोपीने धारदार चाकूने दुसऱ्या व्यक्तीवर सपासप वार केले. हा हल्ला इतका भीषण होता की गंभीर जखमी झालेल्या त्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच उरण पोलीस ठाण्याच्या पथकाने कसलाही वेळ न दवडता घटनास्थळी धाव घेतली आणि आरोपीला ताब्यात घेतले. या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक हानीफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.




18
MAY
वारसा लोकहिताचा
चेहरा नव्या पिढीचा..!
नगरसेवक तथा माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
मा. श्री.
परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा!
शुभेच्छुक
Prop. Jaydip Girase
8668908927/9930348414
SAI CONSTRUCTION
Engineers and Contractor
Email: jaydipgirase444@gmail.com



तरुणाईची क्रेझ पनवेल शहराची दमदार इमेज!
18 MAY
नगरसेवक तथा
माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
मा. श्री.
परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक
शुभेच्छा!
With Best Wishes from...
Zenith Sports
Sr. No. 165/A2, Anand Housing Society, Dhom Colony Road,
Songirwadi, Tal, Wai-412803 (Dist-Satara)
Email-zenithsportwai@gmail.com/zenithsportwai@yahoo.com/zenithsportspvtltd@gmail.com
Mobile-7709165486/9975960786,


नगरसेवक तथा
माजी सभागृह नेते,
पनवेल महापालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा!
18 MAY
With Best Wishes from...
Sai Ganesh Enterprises
GOVT. CIVIL GONTRACTOR,
SWEEPER, CLINICAL LABOUR SUPPLIER
Office: S-10, Jivdani Niwas, Chandersh Lodha Marg, Gala Nagar,
Achole Road, Nallasopara (E), Palghar - 410209


वारसा लोकहिताचा,
चेहरा नव्या पिढीचा..!
18
MAY
नगरसेवक तथा
माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
S. S. ELECTRICAL WORKS
Electrical Engineers & Govt. Licenced Contractor
23, Archies Co. Op. H. Soc. Ltd., Oak Baug, Station Road, KALYAN (W) - 421 301.


नगरसेवक तथा माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक
शुभेच्छा!
18 MAY
शुभेच्छुक
VSC
निलेश पाटील
जितेश म्हात्रे
राकेश पोटे
VASTU SHILP CONSTRUCTION
Govt. Regd. Contractor
Shop No-7, Shree Krushna Kutir Apt., Momin Pada, Panvel 410 206, Raigad.


नगरसेवक तथा माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
मा. श्री.
परेश ठाकूर
18 MAY
यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
वारसा लोकहिताचा, चेहरा नव्या पिढीचा..!
Prop.: Sanjyot B. Shelke (9323265997)
SHREE KRISHNA ENTERPRISES
Govt. License Electrical & Civil Contractor,
Building Material & Water Suppliers
Asudgaon, Near Ram Mandir, Post. Kalmboli,
Tal. Panvel, Dis. Raigad, Navi Mumbai-410 206
Email: sanjyotbhal@gmail.com



गडकरी साहेब









कामाचा लोकार्पण सोहळा.
दिनांक :- १९ डिसेंबर २०२५


युवा शक्ती जागर यात्रा






ग्रामपंचायत





पनवेल विधानसभा



# उमद्या मनाचे व्यक्तिमत्त्व



**लोकनेते** रामशेठ ठाकूर यांची दानशूर वृत्ती आणि आमदार प्रशांत ठाकूर यांचे मार्गदर्शन परेश ठाकूर यांना प्रेरणादायी ठरले. यशस्वी नेतृत्व फक्त स्वतःचा विचार करत नाही. इतराचंही भलं कसं होईल याच्या प्रयत्नात असते. आपण जेव्हा इतरांची काळजी घेतो तेव्हा आपण आपोआप यशस्वी होत असतो. आनंद तसेच सुख मिळवत असतो. परेश ठाकूर यांचे रयत शिक्षण संस्थेशी अतुट नाते आहे. त्यांनी रयत शिक्षण संस्थेस करोडो रुपयांची देणगी दिली आहे. आपदग्रस्तांना मदत करण्याचे, गोरगरिबांना मदत करण्याचे सत्कृत्य अखंडपणे सुरू असते.

जगप्रसिद्ध लेखक व वक्ता शिव खेरा यांची एक प्रसिद्ध कथा आहे. एकदा एक दहा वर्षाचा मुलगा आईस्क्रीमच्या दुकानात गेला. तो टेबलाजवळ बसला. त्याने वेटरला विचारलं, ''आईस्क्रीम कोन केवढ्याला आहे?'' वेटर म्हणाला, ''तीन रुपये''. तो मुलगा हातातील नाणी मोजू लागला. नंतर त्याने आईस्क्रीमचा लहान कप केवढ्याला, असं विचारलं. वेटरने त्रासिकपणे उत्तर दिलं, ''अडीच रुपये''. तो मुलगा म्हणाला 'मला आईस्क्रीमचा लहान कप द्या.'' त्या मुलाने आईस्क्रीम खाल्लं, बिल दिलं आणि तो गेला. वेटर त्याचा रिकामा कप उचलायला गेला आणि त्याला जे दिसलं त्याने त्याचं मन हेलावून गेलं. कपाजवळ आठ आणे त्याने टीप म्हणून ठेवले होते. आईस्क्रीमची ऑर्डर देण्यापूर्वी त्या लहान मुलाने वेटरचा विचार केला होता. त्या मुलाने संवेदनक्षमता आणि कदर करण्याची वृत्ती दाखवली होती. स्वतःचा विचार करण्यापूर्वी त्याने इतरांचा विचार केला होता.

बायबलमधील प्रसिध्द वचन आहे, ''तुम्हांतील कोणी आपलेच हित पाहूं नये. तर दुसऱ्यांचेंहि पाहावें.'' महाविद्यालयात शिकत असताना परेश ठाकूर गरीब तसेच होतकरु विद्यार्थ्यांची फी भरत असत. बस पाससाठी आर्थिक मदत करीत असत. आजच्या सुसंपन्न विद्यार्थ्यांनी त्यांचा हा परोपकारी स्वभाव नजरेआड करू नये.

परेश ठाकूर यांना सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक तसेच क्रीडा क्षेत्रात अभूतपूर्व यश मिळाले आहे. यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, अतिशय मेहनत, कमालीची जिद्द, प्रामाणिकपणा, शिस्त, धडाडी, आत्मविश्वास, कार्य करण्याची पद्धत, समर्पण वृत्ती, वेळेचा सन्मान, कर्तव्याची जाणीव, व्यावसायिक दृष्टिकोन, त्यामधील कौशल्य, उत्तम विचार या सर्व गोष्टी कारणीभूत आहेत.

चिकाटी, मेहनत, सकारात्मक व आशावादी दृष्टिकोन यशाकडे जाण्यासाठी फार आवश्यक आहे. या गुणामुळे परेश ठाकूर यांचा यशाचा, उत्कर्षाचा, प्रगतीचा, सन्मानाचा मार्ग सोपा झाला आहे. त्यांचा आत्मविश्वास उक्ती, कृती, कौशल्ये, ज्ञान आणि व्यवहारामधून प्रकट झालेला आपण पाहतो.

विश्वविख्यात लेखक व वक्ता नेपोलियन हिल पुढील गोष्टींवर अतिशय भर देतात. सुसंघटित, सुव्यस्थित योजना, एक निश्चित, दृढ उद्देश, सहकार्य, सद्भावना, समज, दुसऱ्यांशी सुसंवादी सहकार्य. हे सर्व गुण परेश ठाकूर यांच्या अलौकिक यशाची गुरुकिल्ली आहेत. संस्कृतमध्ये एक सुविचार आहे....

''वपुर्वचन वस्त्राणि विद्या विभव एव च।
वकारपंचहीना न लभन्ते गौरवं नराः॥''

उत्तम व्यक्तित्व लोकांचे लक्ष वेधून घेते. वक्तृत्व कलेने लोकांना आपल्याकडे वळवून घेता येते. सुंदर व नीटनेटके लोकांना मोहवितात. हे सर्व गुण परेश ठाकूर यांच्याकडे आहेत.

परेश ठाकूर नेहमी म्हणतात– स्वतःचं कर्तव्य, कष्ट, मेहनत, चिकाटी, सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळे मला यश मिळत गेले. हेनरी फोर्डनं केवळ जिद्दीच्या बळावर आपलं प्रचंड असं औद्योगिक साम्राज्य स्थापन केले. थॉमस एडिसन जगातला अग्रणी संशोधक झाला आणि आपल्या चिकाटीनं बोलक यंत्र, विजेचा दिवा शोधून काढला. शिवाय पन्नासहूनही अधिक असे उपयोगी शोध लावले.

सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक कार्यासह क्रीडा क्षेत्राची उंची वाढविण्याचे काम परेश ठाकूर यांनी केले आहे. पनवेल फुटबॉल लीग, खारघर मॅरेथॉन, क्रिकेट, कबड्डी, खो–खो, लंगडी या खेळांच्या स्पर्धा परेश ठाकूर यांच्या नियोजनबध्द पध्दतीने अधिक यशस्वी झाल्या. ते नियोजनास अत्यंत महत्त्व देतात. या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी तयारी करण्याची इच्छा व नियोजन त्यांच्याकडे आहे. प्रसिध्द विचारवंत व्हिन्स लोंबार्डी म्हणतात, ''विजयी व्हावं, यशस्वी व्हावं असं सगळ्यांनाच वाटत असतं, पण त्यासाठी आवश्यक ती तयारी आणि कष्ट करायला फारच थोडे लोक तयार होतात.''

परेश ठाकूर यांच्यामुळे पनवेलमध्ये नमो युवा रनला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, 'फिट इंडिया' चा नारा देत व्यसनमुक्त जीवन शैलीचा संदेश जनतेपर्यंत पोहचविला. सीकेटी महाविद्यालयात आंतर–महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. कुस्ती स्पर्धेतून मातीशी नाळ जुळवून ठेवण्याचे काम होते. कुस्तीसारख्या मैदानी खेळाचे ते नेहमीच कौतुक करतात. ते म्हणतात, खेळ केवळ शारीरिक तंदुरूस्तीसाठीच नव्हे, तर मानसिक आरोग्यासाठीदेखील महत्त्वाचा आहे. खेळामुळे व्यक्तिमत्त्व विकास साधला जातो. यातून आजच्या स्पर्धात्मक युगात अनेक संधीही प्राप्त होतात. उत्तम आरोग्य, फिटनेस आणि प्रभावी व्यक्तिमत्वाची सांगड घालणे अत्यंत आवश्यक आहे. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी केवळ शिक्षण पुरेसे नाही.

पनवेल–उरण या भागातील लोकांची एक सांस्कृतिक व धार्मिक परंपरा आहे. या भागातील लोकांची एक उत्सवी प्रवृत्ती आहे. श्रीमद्भागवत, श्री ज्ञानेश्वरी, श्री दासबोध, जगद्गुरु तुकाराम महाराज या संबंधित व्यक्तिगत अथवा सामुहिक पारायणे होत असतात. या वेगवेगळ्या धार्मिक कार्यक्रमांनाही परेश ठाकूर उपस्थित असतात तसेच कीर्तन, प्रवचन, भजन, शोभायात्रा तसेच विविध कार्यक्रमांच्या पूजेला, उत्सवाला, परिचित–अपरिचित मित्रांच्या वाढदिवसाला, लग्नकार्याला ते आवर्जून जातात. या वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी आवश्यक असणारे सर्व प्रकारचे सहाय्यही करतात. त्यामुळे परेश ठाकूर पनवेलकरांना आपलेसे वाटतात.

नागरिकांमध्ये आरोग्याप्रति जागरुकता निर्माण व्हावी यासाठी ते सतत प्रयत्न करतात. पाश्चात्य संस्कृती सांगते– शरीर संपत्ती आहे. उत्तम आरोग्य व फिटनेस आत्मविश्वास, उत्साह, कार्यकुशलता वाढते. व्यक्तिमत्त्व आकर्षक बनते. समाजात एकोपा निर्माण होतो. व्यसनाधीनता नाहीशी होते. आज विविध सांस्कृतिक उपक्रम, विविध क्रीडा स्पर्धा, शैक्षणिक उपक्रम, मॅरेथॉन, काव्यसंध्या, दिवाळी पहाट, आरोग्य महाशिबिर, हजारो विद्यार्थ्यांना वह्या वाटप, दिवाळी अंक स्पर्धा, कवी कुलगुरु कालिदास यांची जयंती, काव्य गायन, ज्येष्ठ कवींचा सत्कार अशा विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात परेश ठाकूर यांना आशातीत यश मिळाले आहे. याबद्दल त्यांचा गौरव झाला आहे.

पनवेल शहरातील कल्पतरु सोसायटीच्या वतीने 'कल्पतरु स्पोर्ट्स वीक'चे उद्घाटन परेश ठाकूर यांच्या हस्ते संपन्न झाले. ते म्हणतात, अशा उपक्रमामुळे आरोग्य समृध्द राहते आणि सामाजिक सलोखा वाढतो. स्पोर्ट्स वीक अंतर्गत क्रिकेट, फुटबॉल, कॅरम आदी खेळांचा समावेश होता.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे मित्र व सुप्रसिध्द शिक्षणतज्ञ डॉ. गजानन श्रीपत खैर म्हणतात, ''मानवी जीवन हे धर्मक्षेत्र आहे. कुरुक्षेत्र आहे, क्रीडाक्षेत्रही आहे. गीता ही रणांगणावरच सांगितली आहे. ती क्रीडाच्या, युद्धाच्या, संसाराच्या, राजकारणाच्या, समाजकार्याच्या सर्वच क्षेत्रात उपयोगी ते इतकी व्यापक आहे.''

क्रिकेट, टेनिस, हॉकी, खो–खो, कबड्डी, मॅरेथॉन, फुटबॉल, कॅरम, कुस्ती, बॉक्सिंग या विविध खेळांच्या सामन्यांच्या द्वारे गीतेचा समत्ववृत्तीचा संदेश परेश ठाकूर यांनी घरोघरी पोहचविला.

सुप्रसिद्ध वक्ता व लेखक रॉबीन शर्मा म्हणतात, ''आपले नेतेपद वा मोठेपण आपण देऊ केलेल्या सेवेपेक्षा, पुढे जाऊन आपण अधिक काही देतो तेव्हाच सुरू होते. मग यश आपोआप आपल्या दारात चालत येते.'' सभागृह नेते असताना त्यांनी विकास योजना, पायाभूत सुविधा, नियोजन यावर लक्ष केंद्रित केले. शिक्षण क्षेत्रातही त्यांचे योगदान लक्षणीय आहे. रायगड जिल्ह्यातील आश्रमशाळा, माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये आधुनिक सुविधांनी समृद्ध केली. कोशिश फाउंडेशनच्या वतीने परेश ठाकूर यांनी व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व विकास यासारखे उपक्रम हाती घेतले आहेत.

सुप्रसिध्द वक्ता व लेखक शिव खेरा यांचे एक वाक्य अत्यंत प्रसिध्द आहे. ''निसर्गाला रिकामेपण आवडत नाही.'' मा.परेश ठाकूर यांनी पर्यावरण क्षेत्रात अनेक उपक्रम राबवले आहेत. रस्ते, वीज व्यवस्था, उद्याने, तलाव, जल पुरवठा योजना आणि नागरी सुविधा यामध्ये परिवर्तन घडले आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे हे परिवर्तन घडत आहे.

जगप्रसिध्द विचारवंत व्हाक्लाव्ह हावेल म्हणतात, ''नुसती दृष्टी असून चालत नाही तर त्याला साहसाची जोड लागते. समोर दिसणाऱ्या मोठ्या जिन्याकडे नुसते पाहून उपयोग नाही तर पुढे जाऊन तो जिना चढायला हवा.'' दूरदृष्टी आणि साहस या दोन्ही गोष्टी हे दोन्ही गुण परेश ठाकूर यांच्याकडे आहेत. ते प्रत्येक काम धडाडीने करतात. कोणत्याही कामाची सुरुवात लगेच करतात. यामुळेच परिवर्तन होत असते. स्वप्नं डोळ्यासमोर ठेवून ते काम करतात म्हणूनच यशस्वी होतात. प्रसिद्ध लेखक व वक्ता नेपोलियन हिल म्हणतात, ''कुठल्याही क्षेत्रातील आघाडीवरचे लोक त्वरित आणि ठामपणे निर्णय घेत असतात. ते आघाडीवर असण्याचं हे एक प्रमुख कारण आहे. जी व्यक्ती आपल्या शब्दाने आणि कर्तृत्वाने आपलं उद्दिष्ट ठाऊक असल्याचं दाखवून देते त्याला त्याचं स्थान देण्यासाठी मार्ग मोकळा ठेवणं ही जगाची सवय आहे.''

परेश ठाकूर हे भेटणाऱ्या माणसाशी आरोग्य, सुख आणि समृध्दीच्या गोष्टी करतात. प्रत्येक गोष्टीची प्रकाशमान बाजू पाहतात. उमद्या मनाचे परेश ठाकूर संताप, रागलोभ यापासून दूर आहेत.

प्लीज, थँक्यू, होय, वाहवा, छान, सुंदर, अभिनंदन यांसारख्या सौजन्यदर्शक शब्दांची साखरपेरणी करण्यास परेश ठाकूर विसरत नाहीत. हस्तांदोलन, स्मित हास्य या गोष्टी आपोआप घडून येतात. यात त्यांच्या मनातील खरा सेवाभाव दिसून येतो.

प्रभू येशू म्हणतात, ''योग्य तें करावयाचा आपल्याला कधीं कंटाळा येऊ नये. आपण सर्वांचे बरें करावें.''

आदरणीय परेश ठाकूर यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

**–प्रा.डॉ.विजयकुमार रणदिवे, पनवेल**

## युवकांचे आधारस्तंभ

**पनवेल** शहराच्या राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात सुवर्ण अक्षराने नाव कोरले गेले पाहिजे अशी कारकिर्द असलेले आमचे युवकांचे आणि व्यक्तिशः माझे गुरू परेशशेठ ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना मनस्वी आनंद होत आहे.

परेशशेठसोबत शहरामध्ये अनेक वेळा विविध क्षेत्रांमध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्यासोबत काम करण्याची संधी म्हणजे आम्हाला एक वेगळाच अनुभव घेता येतो. प्रत्येक वेळी काहीतरी नवीन शिकण्याची सुवर्णसंधीच! कारण त्यांची कामाची पद्धत म्हणजे त्यांची कामाची लकब ही वाखाणण्याजोगी असते. नुसते तोंडाचे भांडवल न करता प्रत्यक्ष कामात स्वतः उतरून योग्य नियोजन करून कोणतेही काम पूर्णत्वाला नेण्याची पद्धत ही आम्हा तरुणांना आदर्श ठरते.

राजकीय क्षेत्रात माझासारख्या सर्वसामान्य कुटुंबातील असणाऱ्या युवकाला परेशशेठ ठाकूर यांनी हाताला धरून उभे केले. पक्षातील वेगवेगळ्या जबाबदाऱ्या दिल्या. त्यांनी दाखवलेल्या विश्वासामुळे मला माझी एक नवीन ओळख निर्माण करता आली. त्याबद्दल मी त्यांचा कायम ऋणी राहीन. ते आमचे अखंड ऊर्जास्रोत आहेत. त्यांना आरोग्यदायी आणि दीर्घ आयुष्य लाभो याच वाढदिवसाच्या शब्दसुमनांनी शुभेच्छा...!

**–देवांशू प्रभाळे, जिल्हा संयोजक, उत्तर रायगड युवा वॉरियर**



## तरुणांचे लाडके नेते

२१व्या शतकात राजकारण हा केवळ मोठे आणि वृद्ध यांच्या रूचीचा विषय राहिलेला नाही, तर अगदी जेन–झीसुद्धा गांभिर्याने या क्षेत्राकडे आणि आपल्या नेत्यांकडे पाहते. अशा वेळी एक आदर्श त्यांच्यासमोर ठेवायचा म्हटला, तर पनवेल–उरणमधून एक नाव सर्वार्थाने पुढे येतं, ते म्हणजे पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते आणि विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर.

तर त्यांच्याकडे येणारा प्रत्येक माणूस पूर्ण समाधान घेऊनच परत जातो ही समाजसेवेची जादू त्यांनी साधली आहे. सहकाऱ्यांशी मैत्री आणि वडीलधाऱ्यांचा आदर यामुळे समाजातल्या प्रत्येक व्यक्तीला परेश ठाकूर यांच्याबद्दल आपुलकी आणि स्नेहभाव आहे.

परेश ठाकूर यांचे वडील, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून समाजसेवा आणि राजकारण याचा वारसा त्यांना मिळाला आहेच, तरीही पारंपरिक आणि चौकटीबद्ध राजकारण करणारा हा नेता नाही, त्यांचे वर्तन अतिशय वेगळे दिसून येते. वक्तशीरपण आणि कामाला प्राधान्य या गुणांमुळे त्यांनी हाती घेतलेला कुठलाही प्रकल्प अथवा कार्यक्रम हा वेळेत पूर्ण होतोच, शिवाय त्यांचा एक वेगळा दर्जासुद्धा दिसून येतो.

नाविन्याची तसेच विकासाची आवड, द्रष्टेपणा, कल्पकता आणि कामाचा झपाटा ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये. जिथे आपल्याशी साधर्म्य साधणार पॅटर्न आपल्याला दिसतो तिकडे आपसूक आपण आकर्षित होतो. परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाच्या आणि कामाच्या याच पॅटर्नमुळे त्यांच्या भोवती कायम तरुणांचा मेळा असतो. आपली कामं किंवा समस्या तत्काळ कृतीतून इथेच सोडवल्या जातील याची तरुणांना खात्री असते, पण केवळ एक वर्ग नाही,

राजकारणाबरोबरच क्रीडा आणि कला याची प्रचंड आवड असलेला हा नेता आहे. त्यांच्या संकल्पनेतून तयार झालेल्या अनेक गोष्टींमुळे आज पनवेल महानगरपालिका क्षेत्र सर्वार्थाने बहरत आहे. त्यात अनेक खेळांच्या स्पर्धा असोत किंवा नव्याने सुरू झालेली अत्याधुनिक क्रिकेट अकादमी असो, पुन्हा एकदा तरुण मैदानी खेळांकडे वळला पाहिजे ही त्यांची भावना ते नेटाने पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. कलेच्या आवडीमुळे त्यांनी सुरू केलेली आणि आता महाराष्ट्रातील एक मानाची ठरलेली अटल करंडक एकांकिका स्पर्धा ते गेली १७–१८ वर्षे भरवत आहेत आणि त्याची व्याप्ती वाढतच चालली आहे. त्याचप्रमाणे पनवेलमध्ये त्यांनी नऊ वर्षांपूर्वी सुरू केलेला दिवाळी पहाटचा कार्यक्रम आज पहाटबरोबर दिवाळी संध्यासुद्धा करत प्रती दिवाळी चार कार्यक्रमांपर्यंत पोहचला आहे. व्यावसायिक कलाकारांबरोबर स्थानिकांनादेखील संधी मिळाली पाहिजे म्हणून त्यांनी सभागृह नेते असताना सुशोभीकरण केलेल्या वडाळे तलावावर 'सूर पनवेलचा' हा कार्यक्रम घेऊन ५०पेक्षा जास्त आठवडे स्थानिक कलाकारांना सादरीकरण करण्याची संधी दिली.



एकाच व्यक्तीला किती क्षेत्रांबद्दल आपुलकी असावी याचं उत्तम उदाहरण म्हणजे परेश ठाकूर. समाजसेवा म्हणजे प्रत्येक घटकाला स्वतःहून मोठं होता यावं यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत ही त्यांची संकल्पना आहे. याच प्रयत्नशीलतेच्या भावनेतून उभी राहिलेली त्यांची संस्था म्हणजे कोशिश फाऊंडेशन. ही संस्था प्रामुख्याने व्यक्तिमत्व–कौशल्य विकास आणि पर्यावरणासाठी काम करते. यातूनच व्यक्तिमत्त्व विकास होईल आणि भविष्यातील नेते तयार होतील असा परेश ठाकूर यांचा ठाम विश्वास आहे. ते केवळ स्वतः राजकारणी नसून त्यांच्या 'कोशिश'मधून भविष्यासाठी सुजाण नेते घडवत आहेत.

जगात भ्रमंती करणं आणि पाहिलेलं, अनुभवलेलं सर्व उत्तम आपल्या कार्यक्षेत्रातसुद्धा झालं पाहिजे हा आग्रह आणि अंमलबजावणीदेखील हा एक कृतिशील गुण त्यांच्यातल्या आधुनिक नेत्याची ओळख पटवून देतो. काही वेगळं करायचं असेल, एखादा अनोखा कार्यक्रम असेल की आपल्या सहकाऱ्यांना आवर्जून कुटुंबप्रमुख म्हणून बरोबर नेणं, त्यांनाही बरोबर सहभागी करून घेणं याच गोष्टी त्यांच्याबद्दलचा स्नेह वाढवतात. प्रसार माध्यमांचा योग्य वापर, त्यावर कामाचे अपडेट जनतेला त्यांच्याशी जोडून ठेवतात. स्वतःपेक्षा इतरांचा विचार आधी त्यांच्या मनात असतो.

परेश ठाकूर यांचं व्यक्तिमत्त्व आणि त्यांचं वलय वेगळं आहे म्हणून तरुण त्यांच्याकडे जास्त आकर्षित होतात. त्यांनी सांगितलेली जबाबदारी चांगल्या रीतीने पार पाडण्याचा प्रयत्न करतात. स्वतः परेश ठाकूर मित्र भावनेने तरुणांशी वागतात, पण ते एक उत्तम मार्गदर्शक म्हणून सगळ्यांच्या



मनात बसलेले आहेत. त्यांच्याबरोबर काम करताना खूप ऊर्जा मिळते. अशाच नेतृत्वाची गरज ही सगळ्याच क्षेत्रात आहे. पनवेलचे भाग्य की आमच्याकडे परेश ठाकूर आहेत. याच नेतृत्वगुणामुळे आणि चांगल्या रीतीने ते सगळ्यांचे 'लाडके बॉस' आहेत. अशा लाडक्या परेश ठाकूर यांना वाढदिवसाच्या माझ्याकडून व माझ्या कुटुंबाकडून उदंड शुभेच्छा!

**–वैभव बुवा, अध्यक्ष, भाजप सांस्कृतिक सेल, पनवेल शहर**



विकासाची दिशा व ध्यास असलेले
कणखर आणि खंबीर युवा नेतृत्त्व..!
नगरसेवक तथा माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
मा. श्री.
परेश ठाकूर
18 MAY
आपणांस
या जन्मदिनी
दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!
WITH BEST COMPLIMENTS FROM
SAINIK
INTEGRATED & SECURITY
PRIVATE LIMITED



18 MAY
नव्या दिशाने, नव्या विचाराने, पाउल तुमचे पुढे पडावे..!
नव्या भविष्याच्या तेजस ज्योतीने, तुमचे प्रगतीपथ प्रकाशमान व्हावे..!
नगरसेवक तथा माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
WITH BEST COMPLIMENTS FROM
GURUJI
INFRASTRUCTURE PVT LTD



तरुणाईची क्रेझ पनवेल शहराची दमदार इमेज!
नगरसेवक तथा माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
18 MAY
शुभेच्छुक
BHOSALE INDUSTRY'S
श्री. प्रताप अनिल भोसले
चेअरमन, भोसले इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड
Office: 303, El Canto, Near Waghbil Naka, Ghodbunder Road, Kavesar Kasarvadavali, Thane West, 400615.
Email ID: bhosale.industrys89@gmail.com, pratapbhosale122@gmail.com


वारसा लोकहिताचा,
चेहरा नव्या पिढीचा..!
18 MAY
नगरसेवक तथा माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
S. M. Hande
93240 46342/9167708537
Mangesh S. Hande
9820571719/9870250423
MALGANGA PRINTING PRESS
COMPUTER STATIONERY PRINTED/BLANK
OFFSET PRINTERS & BOOK BINDERS
SCREEN PRINTERS
CALENDERS
EXAM, ANSWER PAPERS
SOUVENIRS
Off.: "C" Bldg., Room No.1 & 2, Dattadigambar Hsg. Society,
Pantnagar, Ghatkopar (E), Mumbai - 75. Tel.: 022 - 25017758
E-mail: malagangapress99@gmail.com


18 MAY
नगरसेवक तथा माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
प्रितम जनार्दन म्हात्रे
मा. विरोधीपक्ष नेता,
पनवेल महानगरपालिका
जे. एम. म्हात्रे
माजी नागराध्यक्ष,
पनवेल नगर पालिका
J. M. MHATRE INFRA PRIVATE LIMITED
Engineers & Conractors
J. M. Mhatre (Chairman)
Off. Market Yard Plot No. 492, Panvel - 410 206. Dist. Raigad (MS)
